# थोर अशोक (इ.स.पू. २७३ ते इ.स.पू. २३२)

जगाच्या इतिहासात थोर हे विशेषण ज्या बोटावर मोजण्याइतपत सम्राटांना प्राप्त झाले त्यांत अशोकाचे नाव अग्रभागी झळकते. एच जी वेल्स म्हणतो, “जगाच्या इतिहासात जे हजारो राजे-महाराजे होऊन गेले त्यात अशोक एखाद्या तेजस्वी तान्याप्रमाणे चमकतो."
प्रो. नीळकंठ शास्त्री म्हणतात, “अशोकाची कारकीर्द हे भारताच्या इतिहासातील सर्वात तेजस्वी पान आहे. अशोकामुळे तत्कालीन सांस्कृतिक जगात भारताला मानाचे स्थान मिळाले." वारसाहक्काने मिळालेल्या विशाल साम्राज्याचा कारभार अदम्य उत्साह, कुशल प्रशासन आणि मानवतावादी दृष्टिकोनातून करणारा अशोक, प्रजेला सुखाची हमी देणारा अशोक, तलवार हे सर्व समस्यांच्या निराकरणाचे अंतिम साधन म्हणून मान्यता पावले असताना ती तलवार म्यान करून धर्मविजयाद्वारे जगाला बंधुभाव, अहिंसा, करुणा, प्रेम यांचा संदेश देणारा अशोक हे भारतीय तत्त्वज्ञानाच्या मुशीतून तयार झालेले अलौकिक रसायन आहे. बुद्ध, अशोक, गांधी ही भारताने जगाला दिलेली अनमोल देणगी आहे. विनाशाच्या काठावर उभ्या असलेल्या जगाला संपूर्ण विनाशापासून वाचविण्याचे सामर्थ्यं याच त्रिमूर्तीच्या विचारात आहे. असा हा अशोक भारतातच जन्मावा हा योगायोग असून भारतीय इतिहासाची ती अपरिहार्यता आहे. युगायुगातून एखादाच अशोक जन्मतो आणि तोही भारतात यात रहस्य काहीच नसून अशोक हे भारतीय अध्यात्माचे अपत्य आहे.

**अशोकाचे पूर्वायुष्य –**

अशोकाच्या अभिलेखांवरून आपल्याला त्याचे प्रशासन, धार्मिक नीती आणि व्यक्तिमत्वाचे मोजमाप करता येते परंतु या अभिलेखावरून त्याच्या प्रारंभिक जीवनाची कोणतीही माहिती मिळत नाही ही खेदाची बाब होय यासाठी तत्कालीन उपलब्ध साहित्यावरच अवलंबून राहावे लागते. अशोकाच्या आईच्या नावाविषयी इतिहासकारांत मतमतांतरे आहेत. काश्मिरी लेखक कल्हणने त्याच्या राजतरंगिणीमध्ये अशोकाला शकुनीचा नातू म्हटले आहे परंतु हे संयुक्तिक वाटत नाही. महाबोधीवंशामध्ये अशोकाच्या आईचे नाव धम्मा किंवा धर्मा असे सांगितले आहे. अशोकावदानमालामध्ये त्याच्या आईचे नाव शुभद्रांगी असे सांगितले आहे. दिव्यावदान ग्रंथ याच नावाची पुष्टी करतो. काही विद्वानांच्या मते अशोक हा ग्रीक राजा सेल्युकसच्या मुलीचा मुलगा होता. काही इतिहासकारांच्या मते चम्पा निवासी एका ब्राह्मणाने आपली अत्यंत लावण्यवती कन्या बिंदुसारला अर्पण केली. तिच्या स्वर्गीय सौंदर्यामुळे अंतः पुरातील राण्या तिचा मत्सर करू लागल्या व त्यांनी तिला मोलकरणीची वागणूक दिली. काही दिवसांनी ही गोष्ट बिंदुसारच्या लक्षात येताच बिंदुसारने त्या ब्राह्मणकन्येला स्वतःची पट्टराणी बनविले. त्या ब्राह्मण कन्येपासून बिंदुसारला अशोक व विगतशोक असे दोन पुत्र झाले. पालीग्रंथात अशोकाच्या एका बहिणीचा उल्लेख आहे. तिचा मुलगा अग्निब्रह्मशी अशोकाने स्वतःची पुत्री संघमित्राचा विवाह करून दिला. अशोकाच्या पाचव्या शिलालेखावरून त्याला आणखी काही बहिणी असण्याची शक्यता आहे.

वयाच्या १८ व्या वर्षी त्याची अवंती प्रांताचा शासक म्हणून उज्जैन येथे नेमणूक करण्यात आली. उज्जैन येथे शासन करीत असतानाच तो तेथील एका व्यापाऱ्याच्या मुलीवर प्रेम करू लागला. पुढे त्याने तिच्याशी विवाह केला तिचे नाव 'देवी' किंवा 'शककामया' असून पुढे तीच त्याची पट्टराणी झाली. तिच्यापासून त्याला पुत्र महेद्र व पुत्री संघमित्रा ही दोन अपत्ये झाली. या दोघांनी अशोकाला बौद्ध धर्माच्या प्रसारात बरीच मदत केली.

महावंशमध्ये 'असंधिमित्रा' किंवा 'आसन्दिमित्रा' ही अशोकाची पट्टराणी (पिया अग्गमहिषी) असल्याचे म्हटले आहे. ती अशोकाच्या राज्याभिषेकानंतर २६ वर्षांनी मृत्यू पावली. तिच्या मृत्यूनंतर ४ वर्षांनी अशोकाने 'तिष्यरक्षिता' हिला पट्टराणी बनविले. अशोकाला 'पद्मावती' या पत्नीपासून 'कुणाल' नावाचा मुलगा झाला. दिव्यावदानानुसार त्याचे प्रारंभिक नाव धर्मविवर्धन होते. त्याचे नेत्र कुणालसारखे सुंदर असल्याने अमात्यांनी त्याचे नाव पुढे कुणाल ठेवले. अलाहाबाद स्तंभलेखानुसार अशोकाची कारुवाकी किंवा चारुवाकी नावाची राणी होती. तिच्यापासून त्याला तिवर हा पुत्र झाला.

मगधाच्या गादीवर विराजमान होण्यापूर्वीच अशोकाला प्रशासनाचा पर्याप्त अनुभव मिळाला होता. तो अवंती व तक्षशिलेचा शासक होता. तक्षशिला येथे जेव्हा प्रजेने विद्रोह केला तेव्हा विदुसारने अशोकाचीच रवानगी तक्षशिलेला केली होती. संभवतः अवंतीमध्येही बंड झाले होते जे अशोकाने मोठ्या शौर्याने मोडून काढले.महावशानुसार बिंदुसारने अवंतीचे राज्य अशोकाला दिले होते. दीपवंशमध्ये अशोकाला 'उज्जेनीकर-मोली' म्हटले आहे. त्यावरून वरील विधानाला पुष्टी मिळते.

**अशोकाचे राज्यारोहण –**

अशोकाचे राज्यारोहण हा इतिहासातील एक वादग्रस्त विषय होय. बहुतेक इतिहासकारांच्या मते बिंदुसारच्या हयातीत किंवा त्याच्या मृत्यूनंतर मौर्य घराण्यात गादीसाठी संघर्ष झाला. तत्कालीन ग्रंथानुसार अशोक उज्जैन येथे असताना त्याला बिंदुसारच्या आजारपणाची

बातमी कळली. तेव्हा त्याने तत्काळ पाटलीपुत्र गाठले व साम्राज्याचा कारभार स्वतःच्या हातात घेतला. राज्यारोहणाच्या वेळी अशोकाचे वय ३० वर्षांच्या आसपास होते. इ.स.पू. २६९ हे अशोकाच्या राज्यारोहणाचे वर्ष मानावे लागते.

**अशोकाचा साम्राज्यविस्तार**

अशोककालीन निरनिराळ्या ऐतिहासिक साधनांच्या आधारे असे दिसून येते की, अशोकने त्याच्या शासनाच्या १३ व्या वर्षापर्यंत त्याच्या पूर्वजांच्या साम्राज्यविस्तार धोरणाचा तसेच विदेशांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याच्या धोरणाचाच अंगीकार केला. वारसाहक्काने अशोकाला एक विशाल साम्राज्य मिळाले होते त्याच्या साम्राज्याच्या पूर्व सीमेवरील कलिगचे राज्य सोडले तर जवळजवळ संपूर्ण भारत त्याच्या साम्राज्यात मोडत होता. तेव्हा स्वतःच्या साम्राज्याला पूर्णपणे सुरक्षित करण्यासाठी त्याने कलिग मोहीम आखली. काही विद्वान त्याच्या काश्मीर विजयाचा उल्लेख करतात परंतु त्याला पुरेसा आधार मिळत नाही.

**कश्मीरविजय –**

कल्हणच्या राजतरंगिणीनुसार अशोकाने काश्मीरवर स्वारी करून तेथील धर्मारण्य विहारात अशोकेश्वर मंदिराची स्थापना केली होती. अशोकाने कलिगयुद्धानंतर बौद्ध धर्माचा स्वीकार केला असे सामान्यतः मानले जाते. अशोकाने काश्मीरवर विजय प्राप्त करून तेथे शैव मंदिर बांधले असा राजतरंगिणीत उल्लेख येतो. याचा अर्थ बौद्ध धर्म स्वीकारण्यापूर्वी म्हणजे कलिंग युद्धापूर्वीच अशोकाने काश्मीरवर विजय मिळविला असावा. अशोकाच्या काश्मीर विजया संदर्भात इतरत्र पुरावे मिळत नाहीत.

**कलिग विजय**

मगधच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या इतिहासात अशोकाचा कलिग विजय ही युगांतकारी घटना आहे. अशोकाच्या तेराव्या शिलालेखात तसेच इत काही अभिलेखांत या युद्धाची माहिती मिळते. आधुनिक गंजम जिल्हा आणि ओरिसा यांच्या दरम्यान कलिंगने राज्य होते. प्लिनीच्या मते या राज्याची उत्तर सीमो नदीपर्यंत व दक्षिण सीमा गोदावरीपर्यंत होती. डॉ. भांडारकरांच्या मते कलिंग बंगालच्या खाडीच्या किनाऱ्यावरील वैतरणी आणि लांगुलिया नद्यांच्या दरम्यानचा प्रदेश होता. ह्युएनत्संगच्या मते हा प्रदेश अत्यंत सुपीक व समृद्ध होता.

कलिंग युद्धाच्या कारणांचा उल्लेख करताना ह्यएनत्संग म्हणतो की, कलिगमध्ये एक आध्यात्मिक शक्ती लाभलेला शासक शासन करीत होता. त्याची शक्ती क्षीण झाल्यानंतर त्याच्या प्रजेने त्याचा तिरस्कार केला त्यामुळे त्याने संपूर्ण कलिग वासीयांना नष्ट होण्याचा शाप दिला कलिंग युद्ध याच शापाचा परिणाम होय. कलिंग हा मगधच्या नंद शासकांच्या साम्राज्याचा एक भाग होता परंतु चंद्रगुप्त मौर्यच्या नंदा विरुद्ध कारवायात मगधात जी अव्यवस्था निर्माण झाली त्याचा फायदा घेऊन कलिंग स्वतंत्र झाले. चंद्रगुप्त व बिंदुसारला कलिग विजयासाठी वेळ न मिळाल्याने त्यांच्या काळात कलिंग स्वतंत्रच राहिले.

काही विद्वानांच्या मते कलिंग हे मुगध साम्राज्याच्या पूर्व सीमेवरील शक्तिशाली राज्य असल्याने मगधाची पूर्व सीमा असुरक्षित होती. कलिंगयुद्धात कलिनचे जे सैनिक मृत जखमी किंवा कैद झाले त्यांच्या आकडेवारीवरून कलिंगच्या सामर्थ्याची कल्पना . येऊ शकते. अशोकाच्या तेराव्या शिलालेखात उल्लेख आहे की या युद्धात १,५०,००० सैनिक कैद करण्यात आले आणि १,००,००० सैनिक जखमी झाले. मृतकांची संख्या याहीपेक्षा जास्त होती. यावरून कलिगची सेना किती विशाल होती याची कल्पना येते. असे सामर्थ्यशाली राज्य पूर्व सीमेवर असणे मगधाच्या दृष्टीने धोकादायक होते. कलिंग राज्य केवळ शक्तिशालीच नव्हे तर अत्यंत समृद्ध राज्य होते. या राज्याच्या समुद्रकिनाऱ्यावरील बंदरातून विदेशांशी चालणारा व्यापार अत्यंत भरभराटीला आला होता तेव्हा कलिगसारख्या सीमावर्ती शक्तिशाली राज्याला नष्ट करून पूर्व समुद्रकिनारा ताब्यात घेणे या उद्देशाने अशोकाने कलिंगवर स्वारी केली व कलिंग भीषण पराभव केला.

**अशोकाचे साम्राज्य**

अशोकाचे शिलालेख, तत्कालीन साहित्य, परकीर - प्रवाशांची वर्णने आणि अशोकाच्या धर्मयात्रा यावरून त्याच्या साम्राज्य विस्ताराची कल्पना येते. अशोकाच्या दुसऱ्या शिलालेखावरून सेल्यूकसकडून चंद्रगुप्ताने प्राप्त केलेले अरकोशिया, एरियाना, परोपनिसदि हे प्रदेश अशोकाच्या साम्राज्याचा भाग होते. अशोकाने अँटियोक आणि त्याच्या शेजारच्या राज्यात दोन प्रकारची चिकित्साव्यवस्था केली होती.त्याच्या तेराव्या शिलालेखानुसार कळते की ग्रीक शासक तुरमय (इजिप्तचा राजा टॉलेमी), अंतेकिन (मॅसीडोनियाचा अँटिगोनस), मग (उत्तर आफ्रिकेतील सिरीन राज्याचा शासक मगस् जे टॉलेमीचा सावत्र भाऊ होता.) आणि अलिकसुंदर (एपिसरचा शासक अलेक्झांडर) इ. राज्ये अशोकाच्या साम्राज्याच्या पश्चिम सीमेवर स्थित होती. पाचव्या आणि तेराव्या शिलालेखात ग्रीक, कम्बोज

आणि गांधार यांना अशोकाच्या साम्राज्याच्या पश्चिम सीमेवरील राज्ये दाखविली आहेत. यावरून त्याच्या साम्राज्याची सीमा पश्चिमेला हिंदकुश पर्वतापर्यंत पसरली होती हे स्पष्ट होते.

राजतरंगिणीनुसार अशोकाने काश्मीर जिंकून स्वतःच्या राज्यात विलीन केले. ह्यएनत्संग व पुरातत्त्वीय अवशेषांवरून त्याचे राज्य काश्मीरपर्यंत पसरले होते. काळसी, रुम्मनदेई, लुंबिनी आणि निग्लिवा येथील शिलालेखावरून त्याचे साम्राज्य गढवाल तथा नेपाळच्या खोऱ्यापर्यंत पसरले होते. बिहारमधील लौरिया, नंदगढ आणि लौरिया अरराज येथील स्तंभलेखांवरून त्याच्या साम्राज्यात बिहारचा चंपारण्यचा भाग मोडत होता. ग्रीक लेखक, ह्यूएनत्संगचे विवरण आणि बौद्ध ग्रंथानुसार अशोकाचे साम्राज्य पूर्वेला बंगालपर्यंत पसरले होते. परंतु कामरूप (आसाम) त्याच्या साम्राज्याचा भाग असल्याचा उल्लेख कुठेही मिळत नाही. एका शिलालेखात अशोकाच्या दक्षिण सीमेचा उल्लेख मिळतो. त्यानुसार चोल, पांड्य, सत्यपुत्र, केरळपुत्र, ताम्रपर्णी इ. राज्ये त्याच्या साम्राज्याच्या दक्षिण सीमेवर स्थित होती हे कळते. दक्षिणेत मास्की, जटिंगारामेश्वर, सिद्धपूर येर्रगुडी किंवा इरागुडी येथे अशोकाचे शिलालेख आढळून आले आहेत. त्यावरून त्या भागात त्यांचे साम्राज्य होते हे स्पष्ट होते.

वरील विवेचनावरून अशोकाच्या साम्राज्यात काबूल, अफगाणिस्थान तथा हिंदुकुशपर्यंतचा सर्व भूभाग समाविष्ट होता. याव्यतिरिक्त त्याच्या साम्राज्यात बलुचिस्थान, मकरान, सिंध, स्वात नदीचे खोरे, काश्मीर आणि नेपाळसहित पूर्व समुद्रापासून ते पश्चिम समुद्रापर्यंत आणि दक्षिणेला तामिळ प्रदेशापर्यंतचा भाग मोडत होता. म्हणूनच महावंशमध्ये अशोकाला सकल जंबूद्वीपचा शासक मानले आहे.

**अशोकाचे हृदयपरिवर्तन –**

कलिंग युद्धानंतर अशोकाच्या जीवनात एक क्षण असा आला की त्याने हिंसेचा त्याग करून अहिंसेचा मार्ग स्वीकारला. शस्त्र-विजयाचा मार्ग सोडून धम्मविजयाचा मार्ग अनुसरला. इतिहासकारांनी अशोकाच्या हृदयपरिवर्तनामागे बौद्धधर्माचा प्रभाव हे कारण सांगितले आहे. इतिहासकारांच्या मते अशोकाचे हृदयपरिवर्तन ही कलिंगयुद्धानंतर एकाएकी घडलेली घटना होय. कलिगयुद्धात मानवी जीवाचा जो भयंकर संहार झाला त्यामुळे अशोकाचे मन आनंदून उठले. एगर मॉट आणि राधाकुमुद या इतिहासकारांच्या मते हे परिवर्तन अशोकाच्या जीवनात कलिगयुद्धापूर्वीच घडून आले होते.

टॉमस या इतिहासकाराच्या मते अशोकाने कलिंगयुद्धानंतर ताबडतोब बौद्ध धर्माचा स्वीकार केला. कलिगयुद्ध अशोकाच्या शासनकाळाच्या ९ व्या वर्षी झाले व त्यानंतर सुमारे दोन वर्षांनी तो बौद्ध धर्माचा सक्रिय सदस्य बनला. बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर त्याने बौद्ध धर्माच्या अनेक पवित्र स्थळांची यात्रा केली व स्वतःचा संपूर्ण वेळ व शक्ती वैद्ध धर्माच्या प्रसारासाठी खर्च केली. अशोकाच्या हृदयपरिवर्तनाच्या प्रक्रियेला त्याच्या अभिलेखांवरून आपण समजू शकतो. एका लघुशिलालेखात त्याने बौद्ध धर्म स्वीकारल्याचे स्पष्टपणे म्हटले आहे. त्यात तो महणतो, “मी अडीच वर्षांहून जास्त काळ एक साधारण बौद्ध भिक्षू आहे परंतु एक वर्षपर्यंत माझी काहीच प्रगती झाली नाही मागच्या एक वर्षापासून मी संघाच्या अधिक जवळ आलो असून माझा उत्साहही वाढला आहे." यावरून अशोकाचे हृदय किंवा धर्मपरिवर्तन ही आकस्मिक घटना नसून ती संथगतीने पडणारी महिला आहे जर हे परिवर्तन कलिगयुद्धानंतरच्या तीन वर्षात कोणत्या एखाद्या विशिष्ट क्षणी घडले असते तर तेराव्या शिलालेखात त्याचा निश्चित उल्लेख असता

तेराव्या शिलालेखावरून स्पष्ट होते की अशोकाची बौद्ध धर्माविषयी जिज्ञाण कलियुद्धानंतर वाढली. तो कबूल करतो की त्याला एक निष्ठावान आणि सक्रिय बौद्ध होण्यासाठी अडीच वर्षे लागली याचा अर्थ धर्म किंवा हृदयपरिवर्तनाची घटना त्याच्या शासनकाळाच्या १२ व्या वर्षी म्हणजे इ.स.पू. २५७ २५६ या काळात घडली. परंतु ते अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण आहे याविषयी दुमत नाही अशोकाचा धर्म कलिंगयुद्धानंतर अशोकाने भौतिक विजयाचा त्याग करून - नैतिक, धार्मिक व आध्यात्मिक विजयाला सुरुवात केली. अशोक त्याच्या पूर्वायुष्यात शिवाचा निस्सिम उपासक होता परंतु त्याच्या १३ व्या शिलालेखानुसार त्याने बौद्ध धर्म स्वीकारला.

**अशोकाच्या प्रशासकीय सुधारणा**

अशोकाला वारसाहक्काने जे विशाल साम्राज्य मिळाले त्या साम्राज्याचे प्रशासन जास्तीत जास्त प्रजाहितकारी करण्याचा अशोकाने प्रयत्न केला.

१) चंद्रगुप्ताच्या काळात राजाची सत्ता ही देवी मानली जात असे व राजपुरोहिताला भरपूर अधिकार होते. परंतु अशोकाने पुरोहितांच्या अधिकारांना सीमित केले म्हणून त्याच्या अभिलेखांमध्ये पुरोहितांचा कुठेही उल्लेख येत नाही.

२) अशोकाने प्रशासनात सुधारणा घडवून आणण्यासाठी काही अधिकारी नियुक्त केले ज्यात रज्जुक आणि महामात्र हे विशेष उल्लेखनीय होत.

३) अशोकाने त्याच्या शासनकाळाच्या १३ व्या वर्षी राजकीय यात्रांना सुरुवात केली ज्याचा उद्देश विशाल साम्राज्यात सुयोग्य प्रशासन लागू करणे हा होता. यासाठी त्याने निरनिराळे अधिकारी नियुक्त करून त्यांच्याकडे साम्राज्यातील प्रशासकीय कार्याचे नियमित मूल्यमापन करण्याची व त्याचे विवरण सम्राटाला देण्याची जबाबदारी सोपविण्यात आलीप्राचीन भारताचा इतिहास ७५

४) अशोकाने 'पटिवेदक' नामक एका अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. ज्याचे काम साम्राज्यातील सर्व अधिकाऱ्यांच्या विशेषतः उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या कारभारावर गुप्त देखरेख ठेवणे हे होते. या पदामुळे अशोकाला साम्राज्यात अंतर्गत शांतता प्रस्थापित करण्यास बरीच मदत झाली.

५) अशोकाच्या एका अभिलेखात 'पुलिसानी' नावाच्या एका अधिकाऱ्याचा उल्लेख येतो. हा जनसंपर्क अधिकारी असावा...

६) अशोकाने 'इथिझख महामत्त' नामक अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. हा अधिकारी अंतःपूर आणि स्त्रियांसंबंधित विभागांवर नियंत्रण ठेवीत असे. सर्वसामान्य स्त्रियांच्या समस्यांचे निराकरण करणे हेही याचे काम असे.

७) शासनाच्या २७ व्या वर्षी अशोकाने धम्म महामत्त नामक अधिकाऱ्याची नेमणूक केली जो संपूर्ण साम्राज्यात धम्मशिक्षण देणे तसेच राजपरिवारातील सदस्यांना धम्मपालनासाठी प्रोत्साहित करण्याचे काम करीत असे. धम्मयुत नावाचे अधिकारी साम्राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम पाहत.

८) अशोकाने लुम्बिनी या पवित्र गावाला करमुक्त गाव घोषित केले होते. त्याने संपूर्ण राज्यात कायदा व दंड यात एकरूपता आणली. कायद्यासमोर सर्व समान हे तत्त्व त्याने प्रचारात आणले. राज्याभिषेकाच्या दिवशी कैद्यांना मुक्त करण्याची प्रथा सुरू करण्यात आली. शिकारयात्रांची जागा धर्मयात्रांनी घेतली.

९) अशोकाने त्याच्या सर्व अधिकाऱ्यांना प्रशासकीय जबाबदारीबरोबरच धर्मप्रसाराची जबाबदारी पार पाडण्यास सांगितले.

१०) प्रजा व पशुंसाठी दवाखाने सुरू करण्यात आले. औषधी मिळावी म्हणून जडीबुटीची लागवड करण्यात आली. दर अर्ध्या मैलावर विहिरी खोदण्यात आल्या. सडकांच्या दुतर्फा वृक्ष लावण्यात येऊन प्रवाशांसाठी धर्मशाळा बांधण्यात आल्या.

११) अशोकाने प्रजेच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या. एका अभिलेखात अशोक म्हणतो ‘‘कटविये मते हि मे सव्रलोक हिते" याचा अर्थ सर्व प्रजेचे कल्याण हेच माझे कर्तव्य आहे. कलिंग शिलालेखात म्हणतो, ‘‘सवे मुनिसे पजा ममा" मनुष्य माझी लेकरे आहेत.

अशा रीतीने अशोकाने त्याच्या शासनव्यवस्थेत परंपरा आणि नावीन्य यांचा सुरेख मेळ साधला.

अशोकाला थोर का म्हणतात ?

जगाच्या इतिहासात अलेक्झांडर, अशोक, अकबर, पीटर, फ्रेडरिक इ. सम्राट थोर या उपाधींनी विभूषित आहेत. परंतु या सर्वामध्ये अशोक एखाद्या देदीप्यमान जगाच्या इतिहासातील महान किंवा थोर राज्यकर्त्यांमध्ये अशोकाची गणना केली - ताऱ्याप्रमाणे वेगळा उठून दिसतो. तो प्रजेच्या हृदयसिंहासनावर आरूढ झालेला सम्राट होता. त्याच्या महानतेची कल्पना पुढील मुद्यांवरून येईल.

**१) महान व आदर्श विजेता**

विजय आणि हिंसा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हिसेविना विजय ही कल्पनाच संभवत नाही. विशेषतः ज्या काळात केवळ तलवारीचीच भाषा बोलली जात असे त्या काळात अशोक कलिंगयुद्धानंतर तलवार म्यान करून लोकांच्या शरीराला जिंकण्याऐवजी त्यांचे मन जिंकण्याची भाषा बोलताना दिसतो. लोकांना शस्त्राचा धाक दाखविण्याऐवजी त्याने अहिंसा, दया, करुणेचा पवित्र नंदादीप हातात घेऊन लोकांच्या हृदयात डोकावले व त्यांच्या अंतःकरणातील घोर अंधकार दूर करण्याचा प्रयत्न केला. शरीराऐवजी प्रजेच्या मनावर राज्य करण्याची अशोकाची ही अभिनव संकल्पनाच त्याला महान व आदर्श विजेता ठरविते आपल्या धर्ममहामात्रांच्या साह्याने त्याने केवळ भारतातच नव्हे तर भारताच्या बाहेरही धर्मविजय मिळविले. स्वप्नसृष्टीतील ही कल्पना प्रत्यक्षात उतरविल्याने तो महान व आदर्श विजेत ठरतो. -

**२) कुशल प्रशासक –**

अशोकाच्या प्रशासनाचा आधार आध्यात्मिक होता त्याने स्वतः च्या शुद्ध आचरणाद्वारे प्रजेपुढे एक आदर्श ठेवला. प्रशासनाची संपूर्ण यंत्रण व शक्ती त्याने प्रजेच्या कल्याणासाठी राबवली. तो अंत पूर, शयनकक्ष, भोजनगृह कुठेही असो दिवसाच्या कोणत्याही प्रहरी त्याच्यापुढे स्वतःच्या तक्रारी मांडण्याची प्रजेल मुभा होती. यामागे सवंग लोकप्रियता मिळविणे हा अशोकाचा मुळीच हेतू नव्हता तर प्रजेच्या कल्याणाची त्याला खरोखरच तळमळ होती डॉ स्मिथ म्हणतात, "अशोक कुशल प्रशासक होता म्हणूनच आज दोन हजार वर्षांनीही इतिहास त्याला विसरायला तयार नाही.

**३) धर्मपरायण –**

अशोक कलिंगयुद्धानंतर बौद्ध संघाला शरण गेला आणि मनसा, वाचा, कर्मांनी त्याने बौद्ध धर्माचा प्रसार केला ऐहिक सुखांचा त्याग करून संसारात राहूनही त्याने संन्यस्त जीवनाचा स्वीकार केला. त्याच्यात अहिंसा, त्याग, सहिष्णुता, निष्ठा इ सद्गुण ओतप्रोत भरले होते. बौद्ध धर्म त्याने कुणावरही लादला नाही प्राचीन काळात राहत असतानाही तो पुराणमतवादी किंवा संकुचित विचारांचा नव्हता तो अतिशय उदारमतवादी होता त्याच्या धर्मात सर्व धर्मातील चांगल्या तत्त्वांचा समावेश असल्याने त्याच्या धर्माला कुणाचा विरोध असण्याचे कारण नव्हते. म्हणूनच त्याचा जगाच्या बऱ्याच मोठ्या भागात प्रसार झाला त्याने जो बौद्ध धर्माचा प्रसार केला त्यामुळे त्याचे कार्य सेंट पॉल आणि कॉन्स्टन्टाईन या धर्मप्रसारकांपेक्षाही महान ठरते.

**४) सहिष्णू**

अशोक ज्या काळात वावरत होता तो काळ धार्मिक कट्टरतेचा काळ होता. परंतु अशोक धार्मिक बाबतीत अत्यंत सहिष्णू होता. बाराव्या शिलालेखात तो म्हणतो, "देवतांचा प्रिय प्रियदर्शी राजा सर्व धर्माबद्दल आदराची भावना बाळगतो".

**५) राष्ट्रीय ऐक्याचा थोर शिल्पकार** –

अशोकाने संपूर्ण साम्राज्यात राजकीय सुसूत्रता निर्माण केली. साम्राज्यातील सर्व शिलालेखात एकाच पाली भाषेचा वापर करून भाषिक एकात्मता व त्याद्वारे राजकीय एकात्मता निर्माण करणारा तो पहिला भारतीय राज्यकर्ता होय. संपूर्ण साम्राज्यात एक शासन एक न्याय, एक धर्म लागू करणारा अशोक राष्ट्रीय ऐक्याचा थोर शिल्पकार होता.

**६) महान आदर्शवादी** –

अशोकाने राजकीय, सामाजिक आणि धार्मिक जीवनात अशा आदर्शाची मुहूर्तमेढ केली की ज्यांची इतरांना कल्पनाही करता येणार नाही. तो राजकीय जीवनात लोकशाहीचा पुरस्कार करणारा असून 'वसुधैव कुटुंबकम्' या सिद्धांताचा पुरस्कार करणारा होता. समता व बंधुता या उदात्त व पवित्र तत्त्वांचे आचरण करणारा अशोक जगातील एकमेवाद्वितीय सम्राट होय..

**७) प्रजावत्सल** –

अशोकाची प्रजा ही त्याची संतती होती. त्याच्या सर्व योजना प्रजेचे कल्याण डोळ्यापुढे ठेवून राबविण्यात आल्या होत्या. प्रजेची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी तो साम्राज्यभर दौरे काढीत असे व अधिकाऱ्यांना प्रजेच्या हिताची जास्तीत जास्त काळजी घेण्यासाठी तो वारंवार सूचित करीत असे प्रजा सुखी तर राजा सुखी हा त्याच्या प्रशासनाचा मंत्र होता.

**८) सुसंस्कृत**

अशोक हा एक सुसंस्कृत सम्राट होता. त्याच्या काळात वास्तुकलेच्या क्षेत्रात प्रचंड बांधकाम झाले. भवन, स्तूप, विहार, स्तंभ, अभिलेख इ. ची निर्मिती त्याच्या काळात मोठ्या प्रमाणात झाली. डॉ. त्रिपाठी म्हणतात, " अशोकाचे अभिलेख म्हणजे त्याच्या अंतर्मनाचा आरसा आहे. "

**९) महान जनसेवक**

अशोक हा जनतेचा सच्चा सेवक होता. त्याने जनतेच्या सुखसोयीसाठी रस्ते, विहिरी, दवाखाने, धर्मशाळा, विश्रामगृह, दान-गृह इ. ची निर्मिती केली. पशुहत्या, मदिरापान, नृत्य इ. वर बंदी आणून त्याने प्रजेला वाममार्गापासून वाचविण्याचा प्रयत्न केला.

अशोक हे या देशाला पडलेले नितांतरम्य पहाटस्वप्न होय. त्याची तुलना अलेक्झांडर, सिझर, अकबर, नेपोलियन, सेंट पॉलशी केली. जात असली तरी तो त्या सर्वांचा शिरोमणी होता. त्याच्या असामान्य गुणांमुळेच त्याच्या चार सिंहाच्या आकृतीला राष्ट्रीय स्मारक म्हणून मान्यता देण्यात आली आहे. या देशाने जगाला अनेक उपहार दिले आहेत. अशोक हा त्यातील सर्वात देदीप्यमान उपहार होय.